(ग) प्र १

University of Mumbai

**वित्त व लेखा विभाग**
**एफएओ/आयसीडी/२०२३–२४/५७१**
दिनांक: २८.०७.२०२३

प्रति,

मा. शरद कोकाटे
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, कक्ष क्र. ४१४,
मादाम कामा रोड,
मुंबई – ४०० ०३२.

**विषय:–** मुंबई विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठाचे लेखापरिक्षण केलेले सन २०२०–२०२१ या आर्थिक वर्षांचे वार्षिक लेखे महाराष्ट्र शासनास सादर करणेबाबत.

महोदय,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १३५ नुसार, महाराष्ट्र शासनास सन २०२०-२१ या वर्षाचे वार्षिक लेखे व लेखापरिक्षण अहवाल सोबत जोडत आहोत. सदर विलंबनाबाबत आपणांस विनम्रपूर्वक नमूद करू इच्छितो की, नोव्हेंबर २०२० पासून प्रथमच एक व्यावसायिक Chartered Accountant डॉ. (सीए) प्रदीप द. कामथेकर यांची १७ डिसेंबर, २०२१ पर्यंत प्रभारी वित्त व लेखा विभाग अधिकारी व १८ डिसेंबर २०२१ पासून पूर्णवेळ वित्त व लेखा विभाग अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्यापूर्वी वित्त व लेखा विभाग अधिकारी म्हणून महाराष्ट्र शासनाकडून प्रतिनियुक्तीवर नियुक्त करण्यात आलेले अधिकारी काम पाहत होते. त्यावेळेस सन २०२०-२१ या वर्षाचे वार्षिक लेखे तयार करून लेखापरिक्षण करून घेण्याचे काम प्रलंबित होते. त्यावेळेस विद्यापीठाचे सनदी लेखापाल म्हणून काम पाहणाऱ्या सनदी लेखापालांकडे पुरेसे मनुष्यबळ नव्हते. त्यामुळे नोव्हेंबर २०२० नंतर आवश्यक ते मनुष्यबळ असलेल्या नवीन सनदी लेखापालांची विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने

University of Mumbai

नेमणूक केली. त्याचबरोबर मार्च २०२० ला सुरु झालेल्या कोरोनाच्या प्रदुर्भावानंतर कार्यालये सुरु झाल्यानंतर डॉ. (सीए) प्रदीप द. कामथेकर, वित्त व लेखा विभाग अधिकारी यांनी वित्त व लेखा विभागातील कर्मचारी, नवनियुक्त सनदी लेखापाल व त्याचा संघ (Team) यांच्या मध्ये ताळमेळ साधून व लेखा पुस्तकात असलेल्या त्रुटी दूर केल्या. FOX PRO प्रणालीमुळे येणाऱ्या अडचणी दूर केल्या, वित्त व लेखा विभागातील कर्मचाऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण दिले व वित्तीय वर्ष २०२०-२१ पर्यंत लेखापरिक्षण (Audit) करून घेऊन अधिसभेत सदर वार्षिक लेखे व त्यावरील लेखापरिक्षण अहवाल संमत करून घेतलेला आहे.

तरी झालेल्या दिरंगाई बद्दल आम्ही मुंबई विद्यापीठाच्या वतीने दिलगिरी व्यक्त करीत आहोत. तसेच आपणांस विनंती करीत आहोत कि आपण सन २०२०–२०२१ वार्षिक लेखे व त्यावरील सनदी लेखापालांचा लेखापरीक्षण अहवाल दप्तरी दाखील करून घ्यावा ही विनंती.

प्र. कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ.